**त्रास**

तू नसताना सवे माझिया कातर कातर श्वास होतसे
नको नकोसा मनास माझ्या एक वेगळा भास होतसे

असून सारे नसल्याविण ही भरून येते एक उदासी
एकाकी अन् रडवेलासा मनातला मधुमास होतसे

अंगणातल्या जाईपाशी थबकून राही निमूट वारा
गंधविण तो एक जरासा हिरमुसला नि:श्वास होतसे

सूर्य उगवतो चंद्र उगवतो निसर्ग गातो सुरेल गाणे
तुझ्याविना या संसाराचा भयग्राही संन्यास होतसे

तटतटलेले आतून सारे लिहीत नाही अजून काही,
शब्दांनाही विरहाचा या ठसठसणारा त्रास होतसे

**©प्रीती देशपांडे**

www.meetipreeti.com